महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
(CIN NO-U40109MH2005SGC153646)
(GST NO-27AAECM2936N1Z2)

# जाहिर सुचना

४०० केव्ही ग्रहण केंद्र विभाग वाळूज अंतर्गत आय. टी. आय. विजतंत्री (Electrician) शिकाऊ उमेदवारी अर्ज वर्ष २०२३-२४ या सत्राकरीता शिकाऊ उमेदवारांची प्रक्षिक्षणाकरीता भरती घेण्यात येत आहे. करीता खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीना अधिन राहुन इच्छुक पात्र विद्यार्थ्यांनी / उमेदवारांनी दि.१९/१०/२०२३ चे रात्री २३.५९ वाजेपर्यंत www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर आस्थापना क्र. E05202700377 वर नोंदणी करावी.

१. उमेदवार / प्रशिक्षणार्थी / आरक्षण टक्केवारी खालीलप्रमाणे.

| विभागाचे नांव | जागा | टक्के | अ. जा. | अ. ज. | वि.जा. अ. | भ. ज. ब | भ. ज. क. | भ. ज. ड. | वि. मा. प्र | इ. मा. व. | ईडब्लूएस (EWS) | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४०० केव्ही ग्रहण केंद्र विभाग वाळूज | ८ | १००% | १३% | ७% | ३% | २.५०% | ३.५०% | २% | २% | १९% | १०% | ३८% | १००% |
| | | | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | ३ | ८ |

२. ऑनलाईन नोंदणी करण्याची अंतिम दि.१२/१०/२०२३ ते १९/१०/२०२३ चे रात्री २३.५९ वाजेपर्यंत राहिल.

३. वरील प्रमाणे अर्ज करणा-या उमेदवारांनी जाहिराती सोबत जोडलेल्या फॉर्म मध्ये अचुक माहिती भरुन खालील नमूद केलेले दस्तऐवज (अनु.क्र. अ ते छ) (कंपनीच्या धोरणानुसार आरक्षण अंमलबजावणीसाठी आवश्यक) ऑनलाईन अर्जाची Screen shot सह खालील नमुद केलेल्या कार्यालयाच्या पत्त्यावर पोष्टाने किंवा प्रत्यक्ष कार्यालयात दि.२६/१०/२०२३ पर्यंत पोहचतील या बेताने पाठवावे. उशिरा अर्ज प्राप्त झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

४. **कार्यकारी अभियंता,** .४०० केव्ही ग्रहण केंद्र विभाग वाळूज प्लॉट क्र.एल-२,एल-३,एमआयडीसी,वाळूज,
औरंगाबाद-४३११३६.

**यासाठी खालील नमुद केलेले दस्ताऐवज आवश्यक असतील.**

अ. apprenticeshipindia.gov.in या संकेत स्थळावर उमेदवाराची प्रशिक्षणार्थी उमेदवार म्हणुन नोंद असणे बंधनकारक आहे.

ब. जन्म तारखेसाठी १०वी ची सनद आवश्यक.

क. इयत्ता दहावीचे गुणपत्रक

ख. आय. टी. आय. विजतंत्री (Electrician) गुणपत्रक (चारही सत्र / वार्षीक)

ग. आधार कार्ड

घ. मागासवर्गीय असल्यास जात प्रमाणपत्र /आर्थिक दुर्बल घटक असल्यास त्याचेही प्रमाणपत्र.

च. प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे जात प्रमाणपत्र (Non Creamy Layer) (लागू असेल तर)

छ यापुर्वी शिकाऊ उमेदवारी केलेली नसावी.

ज. वरील सर्व कागदपत्रांची **स्वसाक्षांकित** प्रती.

५. सदर भरतीकरीता महापारेषण कंपनीचे संबंधित सर्व परिपत्रके, अटी व शर्ती, नियम व अटी लागु राहतील व अधिक माहितीसाठी www.mahatransco.in या संकेतस्थळावर Carrier या सदराखाली जाहिरात पाहवी.

६. उमेदवारांची निवड त्यांचे आय. टी. आय. चे चारही सत्राच्या गुणांच्या व एस. एस. सी. च्या गुणाच्या आधारे होईल व मौखीक चाचणी घेतली जाणार नाही किंवा इतर कोणतेही गुण ग्राहय धरण्यात येणार नाही.

७. वरील प्रमाणे नमुद अंतिम दिनांका नंतर व ही जाहिरात प्रसिध्द होण्याच्या दिनांकापुर्वी सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

(बी.जी.पोटे)
**कार्यकारी अभियंता**
४०० केव्ही ग्रहण केंद्र विभाग वाळूज

| | | |
|---|---|---|
| MAHATRANSCO<br>Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd | | कार्यालय<br>कार्यकारी अभियंता, ४०० केव्ही ग्रहण केंद्र विभाग वाळूज |
| | संपर्क क्र. | :- २४०-२५५२५३३ |
| | ई-मेल | :- ee2130@mahatransco.in |
| | पत्ता- | प्लॉट क्र.एल-२,एल-३,एमआयडीसी,वाळूज, औरंगाबाद-४३१ १३६ |
| Phone No. 8055002033 | | |
| Email – ee2130@mahatransco.in | | Web – www.mahatransco.in |


जा.क्रं. का.अ/४००के.व्हि./ग्रहणकेंद्र/वाळूज/मासं/५५५

दि, १०.१०.२०२३

# जाहीर नोटीस

महापारेषण ४०० केव्ही ग्रहण केंद्र विभाग वाळूज अंतर्गत शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ नुसार शिकाऊ उमेदवार म्हणुन सन २०२३-२४ करीता वीजतंत्री (ईलेक्ट्रिशियन) या ट्रेडमध्ये भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदर शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी शासनाच्या www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर .४०० केव्ही ग्रहण केंद्र विभाग वाळूज च्या खालील आस्थापना रजिस्ट्रेशन क्रमांकावर ऑनलाईन नोंदणी करण्याची अंतिम तारीख दि. १९/१०/२०२३ चे रात्री २३.५९ वाजेपर्यत राहिल. ऑनलाईन नोंदणी केलेल्या अर्जाची स्क्रीन शॉट काढून त्याशी संबंधीत कागदपत्रे जोडून व जाहिरातीत नमुद पत्त्यावर सोबत दिलेला फॉर्म मध्ये संपुर्ण माहिती भरून खालील नमूद केलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष किंवा पोष्टाने दिनांक २६/१०/२०२३ पर्यंत मिळणे आवश्यक आहे. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही तसेच उशिरा अर्ज प्राप्त झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही यांची नोंद घ्यावी. वीजतंत्री (ईलेक्ट्रिशियन) शिकाऊ उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी हा अधिनियमानुसार १ वर्षाचा राहिल.

| आस्थापनेचा नाव व रजिस्ट्रेशन क्रंमाक | ट्रेड | एकुण | विहित फॉर्म ज्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवयाचा आहे त्या कार्यालयाचा पत्ता |
|---|---|---|---|
| ४०० केव्ही ग्रहण केंद्र विभाग वाळूज E05202700377 | वीजतंत्री (Electrician) | एकुण जागा -८ | **कार्यकारी अभियंता,** ४०० केव्ही ग्रहण केंद्र विभाग वाळूज मो बा नंबर 8055002033 |

शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नौकरी मिळवण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(बी.जी.पोटे)
**कार्यकारी अभियंता**
४०० केव्ही ग्रहण केंद्र विभाग वाळूज

सोबत:- शिकाऊ उमेदवार भरती करता अनुसरित येणारी पध्दत, अटी व फॉर्म

## शिकाऊ उमेदवार भरती करता अनुसरित येणारी पध्दत व अटी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कार्यालयाचे नाव व पत्ता | :- | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित,<br>**कार्यकारी अभियंता,**<br>४०० केव्ही विभाग वाळूज मो बा नंबर 8055002023 |
| २. | मागणी करणारे अधिकारी यांचे पदनाम | :- | कार्यकारी अभियंता |
| ३. | निवड पध्दत | :- | गुणवत्तेनुसार |
| ४. | क) भरावयाच्या पदाचे नाव व संख्या | :- | वीजतंत्री (शिकाऊ प्रशिक्षणार्थी) पदसंख्या : ०८ |
| | ख) शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी | :- | वीजतंत्री १ वर्ष |
| | ग) विद्या वेतन | :- | शासकिय धोरणानुसार |
| ५. | शैक्षणिक अर्हता | १. | इ. १० वी उत्तीर्ण व |
| | | २. | राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद एन. सी. टी. व्ही. टी. नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यताप्राप्त शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधुन आय. टी. आय. दोन वर्ष वीजतंत्री (Electrician) परीक्षा उत्तार्ण असणे आवश्यक. |
| ६. | राखीव पदे | :- | कंपनीच्या धोरणानुसार |
| ७. | भरती प्रक्रिया पुढील प्रमाणे राबविण्यात येईल | १. | जे उमेदवार www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करतील व त्या अर्जाची Screen shot सहीत यासोबत जोडलेला फॉर्म भरून सर्व आवश्यक कागदपत्रासहीत वरील नमूद कार्यालयाच्या पत्त्यावर प्रत्यक्ष अथवा पोस्टाने आवश्यक दस्तऐवजसह पाठवावे. |
| | | २. | आय. टी. आय. उत्तीर्ण गुण व एस. एस. सी. उत्तीर्ण गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. |
| | | ३. | कंपनीच्या विहीत तरतुदीनुसार आरक्षणानुसार निवड यादी तयार केली जाईल. एखाद्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास ते गुणवत्तेनुसार प्रवर्गाचा विचार न करता भरले जाईल. |
| | | ४. | निवड केलेल्या उमेदवारांनी जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडुन वैद्यकिय चाचणी करून घेणे बंधनकारक राहिल. |
| | | ५. | कॉन्ट्रॅक्ट रजिस्ट्रेशन झाल्याशिवाय कोणताही उमेदवार शिकाऊ उमेदवारीस पात्र ठरणार नाही. |
| ८. | वयोमर्यादा | :- | दि.१९.१०.२०२३ रोजी किमान १८ वर्ष पुर्ण /कमाल ३८ वर्ष (मागासवर्गीय /आर्थिक दुर्बलघटक यांना ५ वर्ष शिथीलक्षम) |
| ९. | शिकाऊ उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी करण्याची अंतिम तारीख | :- | दि.१९/१०/२०२३ (२३.५९) पर्यत. |
| १०. | उमेदवारांनी प्रत्यक्ष किंवा पोष्टाने कार्यालयास अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख | :- | दि.२६/१०/२०२३ (१८:१५ वा.) पर्यत. |
| ११. | उमेदवार यांनी घ्यावयाची काळजी बाबत | १. | उमेदवाराने आपला प्रोफाईल तपासुन घेणेची जबाबदारी उमेदवारीची असेल. |
| | | २. | अर्ज सादर करताना एस. एस. सी. उत्तीर्ण गुणपत्रिका व आय.टी. आय विजतंत्री उत्तीर्ण गुणपत्रिका यामध्ये नमुद केलेले नाव व आधारकार्डवर नमुद केलेल्या नावाशी सुसंगत आहे किंवा कसे याची पडताळणी करून माहिती भरावी. |
| | | ३. | एस. एस. सी. गुणपत्रक / प्रमाणपत्र, आय. टी. आय. उत्तीर्ण सर्व सत्रांचे गुणपत्रक / प्रमाणपत्र (चारही सेमिस्टरची) स्वसांक्षाकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज केला असेल तर मागासवर्ग जात प्रमाणपत्र तसेच आर्थिक दुर्बल घटक (EWS) मधुन अर्ज केला तर (EWS) प्रमाणपत्र www.apprenticeshipindia.gov.in वर अपलोड करणे बंधनकारक आहे. तसेच सोबत जोडलेला विहित फॉर्म |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | screenshot आवश्यक दस्ताऐवज अर्जा सोबत सादर करणे बंधनकारक आहे. |
| | | | ४. | शिकाऊ उमेदवारांची सही, प्रवर्ग, जन्मतारीख, एस. एस. सी मार्क, आय. टी. आय. मार्क, ही माहिती अचुक भरण्यात यावी. सदर माहिती उपलब्ध न झाल्यास उमेदवारांचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही. |
| | | | ५. | शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका-याकडुन दबाव आणल्यास संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करणेत येईल याची नोंद घ्यावी. |
| | | | ६. | शिकाऊ उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करताना पोर्टलवर फोटो, मुळ प्रमाणपत्राची सुस्पष्ट स्कॅन करून योग्य रितीने ऑनलाईन माहिती भरावी ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या अर्जाची स्क्रिनशॉट सहीत सोबत जोडलेला फॉर्म सुवाच्य अक्षरात बिन चूक भरुन विहीत कालमर्यादिमध्ये कार्यालयास प्राप्त होतील अशा बेताने प्रत्यक्ष अथवा पोस्टाने संपुर्ण दस्तऐवजसह पाठवावे. |
| | | | ७. | प्रत्येक उमेदवाराची वर्तणुक चांगली व शिस्तप्रिय असणे आवश्यक आहे. या बाबत कोणतीही गैरवर्तणुक केल्यास शिकाऊ कायदा १९६१ मधील १७ अन्वये शिक्षेस ते पात्र ठरतील. |
| | | | ८. | प्रशिक्षण कालावधी संपल्यानंतर ३०० मार्कची (६ तास अवधीची) परिक्षा उमेदवाराने देणे अनिवार्य राहील.<br>जो उमेदवार प्रषिक्षण कालावधी पुर्ण करेल तोच उमेदवार परीक्षेस बसण्यास पात्र असेल. |
| १२. | अचुक माहिती भरणे | :- | | उमेदवारांनी आपली प्रत्येक माहिती अचुकपणे विहित फॉर्म मध्ये भरावी कारण त्यात नमुद माहिती आधारे निवड यादी बनविण्यात येणार असुन त्यात पुन्हा बदल करता येणार नाही. निवड यादीत नमुद उमेदवारांचीच फक्त कागदपत्रे निवड झाल्यानंतर पडताळण्यात येतील. पडताळणी अंती अपात्र ठरल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांचा विचार केला जाईल. **फॉर्म मधील चुकीच्या भरलेल्या माहितीमुळे निवड झाली नाही तर त्यास संपुर्णपणे उमेदवार जबाबदार राहील.** |
| १३. | इतर संबंधित माहिती | :- | | सदर शिकाऊ भरतीमध्ये अंशत: बदल किंवा संपुर्ण रद्द करण्याचे अधिकार हे कंपनी राखुन ठेवत आहे. सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही. तसेच सदर बाबतीत कुठल्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| १४. | निवड यादी | | | www.mahatransco.in या संकेतस्थळावर Carrier या सदराखाली प्रसिध्द करण्यात येईल. |
| १५. | मदतीसाठी संपर्क | :- | | मानव संसाधन विभाग प्रमुखाचा ईमेल आयडी<br>udchr2130@mahatranco.in |

(बी.जी.पोटे)
**कार्यकारी अभियंता**
४०० केव्ही विभाग वाळूज

## शिकाऊ उमेदवारीसाठीचा अर्ज
### (जो जाहिरातीत नमुद पत्त्यावर पाठवायचा आहे)

पास पोर्ट साईज फोटो

१. उमेदवाराचे संपुर्ण नांव (आधार व शैक्षणीक कागदपत्राशी सुसंगत) :-

२. संकेतस्थळावरील नोंदणी क्रमांक :-

३. जन्मतारीख १०वी च्या सनद नुसार :-

४. जातीचा प्रवर्ग (महाराष्ट्र शासनानुसार वर्गीकृत प्रवर्ग) (अजा/अज/विजा-अ/भज-ब/भज-क/भज-ड/विमाप्र/इमाव/ईडब्ल्युएस/खुला) :-

५. आधार क्रमांक :-

६. दहावीचे गुण :- एकुण गुण ____ प्राप्त गुण ____ टक्केवारी ____

७. आय.टी.आय.चे गुण (चार सत्रे) :-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम सत्र एकुण गुण | | प्राप्त गुण | | टककेवारी | |
| व्दितीय सत्र एकुण गुण | | प्राप्त गुण | | टककेवारी | |
| तृतीय सत्र एकुण गुण | | प्राप्त गुण | | टककेवारी | |
| चतुर्थ सत्र एकुण गुण | | प्राप्त गुण | | टककेवारी | |

८. सध्याचा पत्ता :-

९. भ्रमणध्वनी क्रमांक :-

१०. अचुक व कार्यान्वीत ई.मेल पत्ता :-

### प्रतिज्ञापत्र

वर उल्लेखित माहिती ही खरी असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी कुठल्याही पातळीवर रद्द होऊ शकते याची मला कल्पना आहे. अशी उमेदवारी रद्द केल्यास माझी कुठलीही हरकत असणार नाही.

................

(उमेदवाराचे नाव व सही)

**सोबत जोडावयाची कागदपत्रे** — **जोडले आहे/नाही**

| | |
|---|---|
| १ आधार कार्ड | |
| २ दहावीची सनद | |
| ३ दहावीची गुणपत्रक | |
| ४ आय.टी.आय. चे चार सत्राची गुणपत्रके | |
| ५ मागासवर्गीय असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र | |
| ६ आर्थिक दृष्टया दुर्बल घटकात मोडत असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र इ. | |
| ७ www.apprentieshipindia.gov.in याव्दारे ऑनलाईन अर्ज केल्याचे Screen shot/ Print | |
| ८ प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे जात प्रमाणपत्र (Non Creamy Layer) (लागू असेल तर) | |